**रे.दि.मु.नं.१९४/२०१८ मधील नि.१ वरील आदेश**
**(आदेश दि.०६/०७/२०२२).**

प्रस्तूतचा दावा हा वादी यांनी जाहीर ठराव आणि दावा मिळकतीचे सरस–निरस मानाने वाटप होवून मिळणेकामी दाखल केलेला आहे. दाव्याचे अवलोकन केले असता पुर्व–पिठसिन अधिकारी यांनी नि.क्र.३१ आणि ३५ वर दाव्याचे वाद विषय निश्चत केलेले आहेत. दरम्यानचे काळात प्रतिवादी क्र. २ याने त्याचे कैफियत दाव्यात दिलेली आहे. त्या अनुषंगाने ज्यादा मुद्दे निघणे अपेक्षित होते. दावा ज्यादा मुद्दे काढणेवर ठेवण्यात आलेला होता. त्याप्रमाणे, नि.क्र. ५३ वर वाद विषय निश्चित करण्यात आलेले आहेत. परंतु, सदर वाद विषय निश्चित करताना मथळ्यामध्ये ज्यादा वाद विषय हा मजकूर लिहीण्याचा राहून गेलेला आहे. वाद विषया बाबत संभ्रम निर्माण होवू नये म्हणून नि.क्र. ५३ वरील वादाचे मुद्दे हे ज्यादा मुद्दे म्हणून विचारात घेण्यात येत आहे करिता सदरची नोंद नि.क्र.१ वर घेण्यात येत आहे. वादी व प्रतिवादी यांनी सदरच्या आदेशाची नोंद घ्यावी.

(एस. एस. निचळ)
दि.०६/०७/२०२२. २ रे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,वाई